


*Publisher & Owner*
Archana Rajendra Ghodke
Harshwardhan Publication Pvt.Ltd.



ISSN-2319 9318


# वैद्यनाथ कॉलेज


परळी-वैजनाथ, जि. बीड, महाराष्ट्र


डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद संलग्नित व वैद्यनाथ कॉलेज परळी वै. जि.

इतिहास, समाजशास्त्र व प्राणिशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

एकदिवसीय राष्ट्रीय आंतरविद्याशाखीय ऑनलाइन चर्चासत्र



महाराष्ट्रातील दूरदृष्टी नेतृत्व

## लोकनेते गोपीनाथराव मुंडे


Dr. R.K. Ippar
Principal
Vaidyanath College, Parli-Vaijnath

Dr. B.K. Shep
Convener

Dr. V.B. Gaikwad
Convener

Dr. R.D. Rathod
Convener

Vaidyanath College, Parli-Vaijnath

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
Online National Conference
Vidywart® | June 2020 Special Issue | 0 230



# लोकनेते गोपीनाथ मुंडे व ऊसतोड कामगार

प्रा.डॉ. जाधवर.बी.डी
( इतिहास विभागप्रमुख )
बलभीम महाविद्यालय, बीड

प्रस्तावना - बहुजनकेंद्री विकासाचे प्रारूप कृतीमध्ये आणताना गोपीनाथराव मुंडे यांनी रचनात्मक विकासात दृष्टीमध्ये शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य दिल्याचे दिसते. ऊसतोड कामगारांचे हित जोपासण्यासाठी त्यांनी घेतलेले निर्णय हे दूरगामी हिताचे ठरले आहेत. समाजातील अनुसूचित जाती-जमाती, भटके व विमुक्त तसेच मागासवर्गीय यांच्या विकासासाठी त्यांनी आखलेल्या विविध योजनांचे महत्व अनन्यसाधारण होते. त्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासाची दृष्टी हि समग्र समाजाच्या भल्यासाठी कर्म करण्यावर भर देते. लोकविकास आणि सर्वांगीण विकास या त्यांच्या भूमिकेचे वेगळेपण खरोखर लक्षणीय असल्याचे दिसून येते.

भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे देशातील बहुसंख्य लोकांची उपजीविका शेतीवर अवलंबुन आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेत शेती हा एक महत्वाचा घटक असल्यामुळे शेतीच्या क्षेत्रात घडणाऱ्या गोष्टींचा , बदलाचा परिणाम अर्थव्यवस्थेत होत असतो. स्वातंत्र्योत्तर काळात म्हणजे इ. स. १९७० नंतर देशभर शेतकऱ्यांची व्यापक आंदोलन झालेली दिसतात. या आंदोलनद्वारे शेतकऱ्यांनी आपल्या मागण्या राजकीय पातळीवर प्रभावीपणे मांडून नव्या बदलांना चालना दिली आहे. परंतु उत्तरोत्तर हि आंदोलन प्रभावी होत गेलेली दिसतात.

महाराष्ट्रात इ. स.१९७० च्या दशका अखेरीस शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी श्री. शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली एक चळवळ चालू झाली व पुढे ती एक संघटना म्हणून उभी राहिली. त्यामुळे तिचा प्रसार इतर भागात झाला. अशा प्रकारच्या माध्यमातून पुढे कामगार संघटना निर्माण झाल्या. शेतकरी व कामगार वर्गाच्या विकासासाठी संघटना प्रयत्नशील होत्या. त्यात प्रामुख्याने शेतकरी संघटना व कामगार संघटना यांचा उल्लेख प्रामुख्याने करावा लागतो. शेतकरी व कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी महाराष्ट्रात कै.यशवंतराव चव्हाण, कै. वसंतराव नाईक, कै. शंकरराव चव्हाण, कै. उद्धवराव पाटील, सर्वश्री. शरद जोशी, अनिल गोटे, गंगाप्रसाद अग्रवाल, प्रा. एन.डी.पाटील, शरद पवार,विलासराव देशमुख, गोपीनाथराव मुंडे, विजयराव गव्हाणे, जयसिंगराव गायकवाड , केशवराव धोंडगे, पाशा पटेल, किसनराव देशमुख, आदींचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो.

ऊसतोड कामगारांच्या विकासात गोपीनाथराव मुंडे यांचे योगदान महत्वाचे आहे. औद्योगिक आणि कृषी क्षेत्राचे, क्रांतीचे साधन म्हणून महाराष्ट्रासह मराठवाड्यातदेखील अनेक साखर कारखाने ऊसतोड कामगार वर्गावर अवलंबून असतात. म्हणून